International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—5 RNI : RAJBIL/2009/30097

*शोध पत्र-लोक प्रशासन*

Feb, 2010

# दहशतवाद-शासनापुढील एक कडवे आव्हान

*** श्री. स्वप्निल हनुमंतराव पेंडलवार**

**** श्री हटकर जळबा उमाजी**

* अधिव्याख्याता, लोकप्रशासन विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड, महाराष्ट्र

** अधिव्याख्याता लोकप्रशासन विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड, महाराष्ट्र

दहशतवाद हा जागतिक स्तरावरील दोन गटातील संघर्षाचा परिणाम आहे. युरोपीयन समुदाय आणि अरब देश या दोघातील संघर्षानेच दहशतवाद नावाच्या विषारी रोपटयाला जन्म घातले. ओसामा बिन लादेन ज्याने संपुर्ण जगाला **वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेटॅागानवर** 9/11 रोजी हल्ला करून दहशतवादाचे भयंकर रूप दाखविले, ज्याने जगातील महासत्ता असलेल्या अमेरीकेला हादरवून सोडले या लादेनला दहशतवादी बनविण्याचे काम अमेरीकेनेच केले. परंतू आज तोच लादेन अमेरीकेला उध्वस्त करीत आहे. अमेरीकेतील **(F.B.I.)** नावाची गुप्तचर संघटना, जिच्या संदर्भात असे म्हटले जाते की, प्रशांत महासागरात जर एखादी अंगठी टाकली तर 24 तासाच्या आत ती अंगठी शोधून काढते. परंतू त्याच (F.B.I.) ला लादेन आजपर्यंत सापडला नाही. या मागील मुख्य कारण म्हणजे लादेन हा फक्त अल–कायदा या दहशतवादी संघटनेचा प्रमुख नसून तो संपुर्ण ईस्लामीक देशाच्या वतीने त्यांच्या अस्तित्वाची लढाई लढणारा एक नेता आहे की. परंतू या दहशतवादाचे बळी असे देश देखील होत आहेत की, ज्यांचा या वर्ग संघर्षाषी काहीच संबंध नाही. भारतामध्ये दहशतवादाची समस्या ही इतर आशियाई देशापेक्षा अधिक प्रखर आहे. **मुंबईवरील 26/11** चा दहशतवादी हल्ला हा 21 व्या शतकातील सर्वात मोठा हल्ला असून हे शतक या हल्ल्यामुळे प्रत्येक भारतीयांसाठी एक दुखःद आठवण म्हणून स्मरणार्थ राहील. हा हल्ला फक्त मुंबईवरच झाला नसून भारतातील लोकशाही व्यवस्थेवरच त्याचा आघात झालेला आहे. आज आतंकवाद एवढा प्रभावी होत आहे की, फक्त एक लाख रूपयात **लश्कर–ए–तैयबा व अल–कायदा** या सारख्या दहशतवादी संघटना मानवी बॅाम्ब तयार करत आहेत. पाकिस्तान मधील बहाबलपुर नावाच्या प्रांतामध्ये या संघटना आतंकवाद्यांना प्रशिक्षण देत आहेत. पाकिस्तान मधील (I.S.I.)या गुप्तचर संघटनेने भारतावर 26/11 सारखे असंख्य हल्ले करण्यास कंबर कसली आहे. भारताच्या सिमावर्ती भागातून या मानवी बॅाम्बसना भारतात पाठविण्याची तयारी केली जात आहे. मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड व लष्कर–ए–तैयबा चा दहशतवादी **डेव्हिड हेडली** आज जरी विदेशामध्ये जेरबंद असला तरी असे अनेक हेडली आज पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. तसेच भारताच्या विकासाचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या (I.T.) क्षेत्रावर सुध्दा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे. अशी स्पष्टोक्ती नुकतीच भारताच्या गृहमंत्र्यांनी केली. थोडक्यात संपुर्ण जगासोबतच भारतासाठीही दहशतवाद ही एक गंभीर समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर भारतासहीत सर्वच देशातील शासन व प्रशासन व्यवस्थेसमोर कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे कडवे आव्हान उभे आहे. परंतू वस्तूस्थिती अशी आहे की, भारतातील कोणत्याच राजकीय पक्षाच्या अजेंडयामध्ये दहशतवाद निर्मुलनास प्राथमिकता दिलेली दिसत नाही दहशतवादाचा सर्वात जास्त धोका सामान्य नागरीकांना आहे. कारण दहशतवादी हल्ल्यात निष्पाप लोकांचाच बळी जातो. ज्याची प्रचिती मुंबईवरील हल्ल्यात प्रकर्षाने आली. त्यामुळे या समस्येवर शासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. प्रत्येक दहशतवादी कारवायांवर सरकारचे लक्ष असावे. दहशतवादावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी शासनाची व प्रशासनाची भूमिका खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**दहशतवाद व शासनाची भूमिका**–दहशतवादी कारवाया रोखण्यात सरकार व प्रशासन अपयशी ठरत आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे भारतीय व विदेशी गुप्तहेर संघटनामधील समन्वयाचा अभाव होय. देशी आणि विदेशी गुप्तहेर संघटनामध्ये माहितीची देवाण घेवाण होणे अत्यंत आवश्यक आहे. दहशतवाद निर्मुलनासाठी तयार होत असलेल्या योजना,

डावपेच, व नविन कायद्यांची माहिती एकमेकांना देवून सहकार्य केल्यास दहशतवादी हल्ले रोखण्यात यश मिळवता येवू शकते. परंतू असे होत नाही. उदा. अमेरीकेतील (F.B.I.) ही गुप्तचर संघटना नोव्हेंबर 2009 मध्ये भारतात आली व त्यांनी मुंबई हल्ल्यातील जेरबंद आरोपीविषयी संपुर्ण माहिती घेतली पण भारताला हेडली प्रकरणा संदर्भात कोणतीच माहिती दिली नाही. थोडक्यात वेगवेगळया देशातील गुप्तहेर संघटनामध्ये समन्वय व सहकार्याची भावना असणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यासाठी सर्वच देशातील शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

भारतीय शासन व्यवस्थेजवळ दहशतवादाचा समुळ नाश करण्यासाठी कोणतीच योजना नाही. दहशतवादी हल्ला झाल्यानंतर आपल्या शासनास जाग येते व मर्यादीत कालावधीसाठी काही बदल देखील केले जातात. 'वराती मागून घोडे' अशी अवस्था आपल्या शासनाची आहे. दहशतवादी हल्ला रोखण्यासाठी पुर्वीपासूनच कोणतेच नियोजन शासन व प्रशासनाकडून केले जात नाही. उदा. मुंबईवरील हल्ल्याची माहिती शासनास अगोदरच मिळाली होती. जर सुरक्षा यंत्रणा वेळीच सतर्क झाली असती तर आपण आपले शुर सैनिक व निष्पाप लोकांचे जीव वाचवू शकले असतो. भारतातील शासन व्यवस्थेजवळ कोणतीच प्रोटोकॉल व्यवस्था उपलब्ध नाही जशी अमेरिकेजवळ आहे. तसेच भारतीय प्रशासनाकडे आधुनिक तंत्रज्ञान सुध्दा नाही ज्याद्वारे दहशतवादी कारवायांवर नियंत्रण ठेवणे शक्य असते. **N.S.G.(नॅशनल सेक्यूरेटी गार्ड)** फोर्स एक उत्तम फोर्स म्हणून ओळखली जाते. तीच्या संख्येत वाढ करण्यात यावी. मुंबई हल्ल्यानंतर भारतातील **मुंबई, कोलकात्ता, चेन्नई व हैद्राबाद** या चार शहरामध्ये N.S.G.हब (गट)स्थापन करण्यात आले. परंतू भारताच्या सिमेलगत असलेल्या राज्यामध्ये असे हब निर्माण करण्याची गरज आहे. तसेच N.S.G.च्या मानवी शक्तीमध्ये देखील वाढ करण्यात यावी. **'नाईट व्हिजन डिवाइस व वेपन साईट्स'** सारख्या अत्याधुनिक उपकरणांची खरेदी शासनामार्फत करण्यात यावी. कारण आज जी शस्त्रे N.S.G. कडे आहेत ती जुन्या स्वरूपाची आहेत. या उलट दहशतवाद्यांजवळ अत्याधुनिक शस्त्र उपलब्ध आहेत. थोडक्यात शासनामार्फत N.S.G. सारख्या फोर्सला अत्याधुनिक शस्त्र उपलब्ध करून दिली जावीत. शासनाजवळ उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तंत्राचा प्रभावी उपयोग करण्यात देखील प्रशासन अपयशी ठरत आहे. गुप्त माहिती एकत्रीत करणे व संरक्षण प्रणालीचे सुदृढीकरण करणे, भूमिगत असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेणे ही सर्व कार्य तंत्रज्ञानाचा आधारे करणे शक्य आहे. उदा. वाहनांची नंबरप्लेट ओळखणारे यंत्र, दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी उपयुक्त ठरते. या यंत्राद्वारे अनोळखी वाहनाचा शोध घेता येतो, त्या वाहनास चालवणाऱ्याची माहिती प्राप्त करता येवू शकते. ज्या ठिकाणी दहशतवादी हल्ला झाला त्या ठिकाणच्या वाहनांचा दहशतवाद्यांमार्फत होणारा दुरूपयोग रोखता येऊ शकतो तसेच हल्लेखोरास पकडता येऊ शकते. त्यामुळे प्रशासनामार्फत शासनाच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

वरील उपायाशिवाय विविध राज्यामधील पोलीस यंत्रणेचे सक्षमीकरण करणे, प्रशासनातील दप्तर दिरंगाई कमी करणे, भारतीय व विदेशी गुप्तहेर संघटनांमध्ये सतत चर्चा घडवून आणण्यासाठी एक मंच तयार करणे, दहशतवाद निर्मुलन करणाऱ्या योजनांवर अधिक पैसा खर्च करणे इत्यादी मार्गाद्वारे शासन दहशतवादावर नियंत्रण प्रस्थापित करू शकते. आज सुध्दा पोलीसांच्या प्रशिक्षणांचा मुद्दा सरकार गांभीर्याने घेत नाही. हवालासारख्या प्रकरणातून व खंडणीद्वारे निर्माण होणारा पैसा आतंकवाद्यांना मिळत आहे. परंतू काही लाचखोर अधिकाऱ्यांमुळे या अशा वित्त पुरवठयावर सरकार बंदी आणण्यात अपयशी ठरत आहे. सरकारच्या भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेमुळे ही समस्या 'जैसे थे' आहे. समुद्रीकिनाऱ्यावर गस्त वाढवून व नावीक दलाच्या सक्षमीकरणाद्वारे शासन समुद्रमार्गे होणाऱ्या दहशतवाद्यांच्या घुसखोरीला आळा घालू शकते. त्यासाठी मानवीशक्तीत वाढ करणे आवश्यक आहे. दहशतवाद्यांनी रासायनिक व जैवीक शस्त्राचा वापर केला तर होणाऱ्या जीवितहानीची कल्पना देखील करता येऊ शकत नाही. थोडक्यात अनुभवाच्या आधारे शासनामार्फत दहशतवाद रोखण्यासाठी कठोर पाऊले उचलली जावीत दहशतवाद मानवता नष्ट करण्यात कोणतीच कसर ठेवणार नाही. त्यामुळे शासनाने देखील दहशतवाद नष्ट करण्यात कोणतीच कसर ठेवू नये.

## सन्दर्भ ग्रन्थ

1) इंडिया टूडे – 9 नोव्हेंबर 2009, 2) प्रतियोगीता दर्पण–11 नोव्हेंबर 2009, 3) Global Terrorism-Prof. Ramesh Chandra. 4) इंडिया टूडे–16 डिसेंबर 2009, 5) दैनिक लोकसत्ता